लोकमत

# २२ हजार विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. कॉम., एम. एस्सी., एम. जे., एम. ए., बी. एस्सी, आदी विविध अभ्यासक्रमांच्या १२३ विषयांच्या ऑनलाईन परीक्षा सोमवारी झाली. त्यासाठी नोंदणी केलेल्या २२७४० विद्यार्थ्यांपैकी २२३९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ११६ विद्यार्थी परीक्षा देताना संशयास्पदरीत्या हालचाल करताना विशेष पथकास आढळून आले. त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये आजपासून भरणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोना, ओमायक्रॉनचा प्रादुर्भाव कमी असलेल्या ठिकाणी १ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यास राज्य शासनाने परवानगी दिली. मात्र, शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र २४ जानेवारी संपले असून, महाविद्यालयांना सुटी सुरू झाली. त्यामुळे शासनाने दिलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालये सुरू झाली नाहीत.

कार्यक्षेत्रातील महाविद्यालये आज, बुधवारपासून ऑफलाईन पद्धतीने भरणार आहेत. विद्यापीठाचे पहिले शैक्षणिक सत्र गतवर्षी १ ऑक्टोबरला सुरू झाले. हे सत्र यावर्षी २४ जानेवारीला संपले. त्याच्या दुसऱ्या दिवसापासून महाविद्यालयांना सुटी सुरू झाली असून, ती मंगळवारपर्यंत होती. त्यामुळे बुधवारपासून महाविद्यालये पूर्ववत ऑफलाईन पद्धतीने भरणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील २७६ महाविद्यालये आणि विद्यापीठातील ३४ अधिविभागांमधील सुमारे दीड लाख विद्यार्थ्यांचे वर्ग भरणार आहेत.

कला, वाणिज्य विद्याशाखेच्या महाविद्यालयांतील वर्ग सकाळी ७ पासून, तर विज्ञान विद्याशाखेचे सकाळी अकरानंतर भरणार आहेत. हिवाळी सत्रातील पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा संपल्या आहेत. तृतीय वर्षाच्या परीक्षा अंतिम टप्प्यात असून द्वितीय वर्ष परीक्षा सुरू होणार आहेत. दरम्यान, ऑफलाईन वर्ग भरविण्याची तयारी महाविद्यालयांनी केल्याची माहिती प्राचार्य असोसिएशनचे सचिव डॉ. व्ही. एम. पाटील यांनी दिली.

लोकमत

# 'मी कवितेपायी खाक जळाया आलो...'

## विद्यापीठातील काव्यधारांत रसिक चिंब

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'शेतामधी माझी खोप, तिला बोराटीची झाप, तिथं राबतो, कष्टतो, माझा शेतकरी बाप...', 'गावाकडं चल माझ्या दोस्ता...' आणि 'मी कवितेपायी जळाया आलो, जगण्याच्या वाटा अन् उजळाया आलो...' या आणि अशासारख्या कवितांच्या धारांमध्ये काव्यरसिक विद्यार्थी-विद्यार्थिनी चिंब झाले.

ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव आणि गोविंद पाटील यांनी या धारा बरसविल्या. निमित्त होते विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित विशेष काव्यवाचन समारंभाचे! विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि हिंदी अधिविभागाच्या सहकार्याने ग्रंथालयामोरील उद्यानात हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव यांनी 'कबीर' ही आपली दीर्घकविता सादर करून प्रारंभ केला. कवी गोविंद पाटील यांच्या वैविध्यपूर्ण काव्य सादरीकरणाने रसिक नादावले. कवीवर्य सुरेश भट यांच्या 'लाभले अम्हास भाग्य...' हे उपस्थितांना सामूहिकरीत्या म्हणावयास लावून त्यांनी वातावरणनिर्मिती केली. कवीवर्य शंकर वैद्य यांच्या 'वाळवंटातून भीषण चालले जीवन' ही कविता सादर करून समारोप केला. यावेळी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. आलोक जत्राटकर, ज्येष्ठ साहित्यिक दि. बा. पाटील, रवींद्र जोशी, धनाजी घोरपडे, सुजाता चोपडे, संध्या पाटील, कवी मंदार पाटील उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात मंथली इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिवाजी विद्यापीठ सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेज आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनतर्फे इनोव्हेशन चॅलेंजअंतर्गत सामान्य माणसाला येणाऱ्या समस्यांवर त्यांचे सर्जनशील, नावीन्यपूर्ण व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य उपाय देण्याकरिता नवउद्योजकांना निमंत्रित करण्यात आले आहे. विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व समाजातील प्रत्येक संवेदनशील, सर्जनशील वैयक्तिक भागधारकांना समाजातील विविध प्रश्नांवर उपाय शोधण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. गुगल फॉर्मच्या माध्यमातून एक लिंक तयार केली असून, विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी दिली.

पुढारी

# करिअरसाठी वास्तववादी मूल्यमापन उपयुक्त : नाईक



**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

व्यवस्थापकीय करिअरमध्ये विविध प्रकारची तर्क-कौशल्ये व समस्या-सोडवणूक कौशल्ये प्रभावी ठरतात. त्या अनुषंगाने बलस्थाने, दुर्बलस्थाने, संधी आणि आव्हाने यांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. उत्तम करिअर निवडीसाठीवास्तववादीप्रतिसादात्मक मानसशास्त्रीय मूल्यमापन उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन मानसशास्त्रज्ञ प्रा. डॉ. भरत नाईक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. विभागातर्फे 'आझादी का अमृत महोत्सवा'निमित्त आयोजित मानसशास्त्रीय मूल्यमापन कार्यक्रमात ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. प्रा. महाजन म्हणाले, करिअर निवडीच्या गोंधळात न राहता विद्यार्थ्यांनी सकारात्मक बदल घडवून आणला पाहिजे.

शिक्षकांनी त्यांना त्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. अनुप मुळे यांनी केले. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले. या प्रसंगी डॉ. गंधाली खारगे, डॉ. रामदास बोलके उपस्थित होते. व्याख्यानानंतर करियर निवडीस उपयुक्त अशी विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय मूल्यमापन चाचणी घेण्यात आली.

02 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्युबाच्या शिष्टमंडळाची शाहू साखर कारखान्यास भेट

## 'शाहू' च्या नवीन उपक्रमांचे, अद्ययावत तंत्रज्ञान वापराचे केले कौतुक

कागल : प्रतिनिधी

क्युबा सरकारच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्प, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरण मंत्रालयाच्या संचालिका अँडिलेडिस रायझ बारसेनास व राष्ट्रीय रेशीम प्रकल्प, वनस्पती संरक्षण आणि जैव-नैसर्गिक उत्पादन संशोधन केंद्र, हवाना (क्युबा) चे संशोधक कार्लोस डेव्हिड क्रुझ मेसा यांच्या शिष्टमंडळाने साखर कारखानदारीत देशात आदर्श असलेल्या येथील श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्यास भेट दिली व



कागल : शाहू साखर कारखान्यास अभ्यास दौऱ्यानिमित दिलेल्या भेटीवेळी अँडिलेडिस रायझ बारसेनास, कार्लोस डेव्हिड क्रुझ मेसा, ए. डी. जाधव, डी. एच. फाळके, जितेंद्र चव्हाण

शाहूच्या नवीन उपक्रमांचे आणि अद्ययावत तंत्रज्ञान वापराचे कौतुक केले.

भविष्यातील साखर उद्योगाच्या फायद्यासाठी सुधारित ऊस जाती, ऊस विकास योजना, ऊस उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान, आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञान, साखर पुनःप्राप्ती या विषयाची सविस्तर माहिती घेण्याच्या दृष्टीने ही भेट होती.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या शिफारशीने या विषयाची माहिती घेण्यासाठी शाहू कारखान्याची निवड करण्यात आली होती. राहुरी विद्यापीठाच्या वतीने या शिष्टमंडळाचे समन्वयक डॉ. डी. एच. फाळके उपस्थित होते. शाहू साखर कारखान्याच्या शेतकरी हिताच्या योजनांचे, अद्ययावत तंत्रज्ञानाची व नवीन उपक्रमांची कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण यांनी शिष्टमंडळास माहिती दिली. शिष्टमंडळाने कागलमधील शेतकऱ्यांचे व कारखान्याच्या क्षेत्रातील ऊस जातींची व शाहूच्या माती परीक्षण शाळेची माहिती घेतली.

अभ्यास दौऱ्यात शिवाजी विद्यापीठाच्या रेशीम उष्मायन केंद्र व प्राणीशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव हे सहभागी झाले होते. यावेळी ऊस विकास अधिकारी के. बी. पाटील उपस्थित होते.

सकाळ

# महाविद्यालयांचे दुसरे सत्र आजपासून होणार प्रारंभ

एकूण महाविद्यालये : २७६
अधिविभाग : ३४
विद्यार्थी संख्या :
सुमारे दीड लाख

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये उद्यापासून (ता. २) सुरू होत आहेत. परीक्षा संपल्याने विद्यार्थी पुन्हा वर्गात हजेरी लावणार असून, दुसऱ्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार आहे.

कोरोना, ओमिक्रॉनचा प्रादुर्भाव वाढू लागल्यानंतर शासनाच्या सूचनेनुसार विद्यापीठातील अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग ७ जानेवारीपासून सुरू झाले. शाळाही ऑफलाईन सुरू झाल्या. त्यानंतर शासनाने १ फेब्रुवारीपासून ऑफलाईन महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी दिली असली तरी विद्यापीठाचे शैक्षणिक सत्र २४ जानेवारीला संपले आणि महाविद्यालयांची सुट्टी सुरू झाली. त्यानंतर विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने ऑनलाईन परीक्षा जाहीर केल्या. तसेच २ मार्चपासून दुसरे सत्र सुरू होईल, असे जाहीर केले होते. त्यानुसार उद्यापासून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालये भरणार आहेत.